**नि.दि.मु.नं.७८/२०२३ (नि.६६ लगत)**

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादी क्रं.१ ते ४ तर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एम. यु. शिंदे**

१. गणपत विष्णु धायगुडे हा माझा मुलगा आहे. मुलाने मला मुखत्यारपत्र दिले असुन ते मी दाखल केलेले आहे. मी शाळा शिकलेलो नाही. माझा जबाब मी दाखल करण्यापुर्वी वाचुन घेतलेला आहे. गणपत हा नोकरीनिमित्त बाहेरगावी आहे. त्याचे पंधरावीचे शिक्षण झाले आहे. तो शिक्षक म्हणुन नोकरीस आहे. तो दहा ते बारा वर्षापुर्वीच नोकरीस लागलेला आहे. हे मला सांगता येणार नाही की वयाच्या कितव्या वर्षी त्याला नोकरी लागली. दावा मिळकतीचे गट नं.८९ व ८६ आहे. भिकु गणु धायगुडे यांना मी पाहिलेले आहे. धरणामुळे आमच्या गावातील जमीनींना पुर्नवसनाचे शिक्के पडले होते. गट नं.८२, ८६, ५१४ व ५१५ हया माझ्या वडिलार्जित मिळकती आहेत. संपादनात माझी जमीन गेलेली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की ८ एकराच्या वरती क्षेत्र असल्यास पुर्नवसनात घेत होते. हे म्हणणे खरे आहे की पुर्नवसनाचे शिक्के पडल्याने विक्री करण्यास दि.०५.०२.१९८६ पासुन बंदी होती. हे म्हणणे खरे आहे की संपादनाची नोटीस मुळ मालक चंद्राबाई धायगुडे हिला मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की संपादनाची रक्कम मुळ मालकाच्या खात्यावर जमा केली होती. हे म्हणणे खरे आहे की सरकारतर्फे दावा मिळकतीचा कब्जा घेण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की गट नं.८९ चे संपादनाचेवेळी गट नं.८९/१ व ८९/२ असे पोटहिस्से पाडले होते. हे म्हणणे खरे आहे की गट नं.८९/२ हा गट ४० आर चा होता व ८९/१ हा गट ५ आर + पोट खराब २ आर असा ७ आर चा होता. हे म्हणणे खरे आहे की पुर्नवसनाचा शिक्का पडल्यानंतर जमीनीची खरेदीविक्री करण्याकरीता पुर्नवसन खात्याची परवानगी घ्यावी लागत असे. हे म्हणणे खरे आहे की खरेदीपत्राच्यावेळी मिळकतीचा सात बारा उतारा व पुर्नवसन खात्याची परवानगी जोडावी लागत होती. हे म्हणणे खरे नाही की आमच्या खरेदीपत्राचेवेळी पुर्नवसन खात्याची परवानगी घेतली नव्हती. पुर्नवसन खात्याची परवानगी दाखल करणेस मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की माझा मुलगा गणपत यानेच सर्व माहिती घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की जबाब देण्याकरीता गणपत हा रजा काढुन येवु शकतो. दस्ताचेवेळी मी उपस्थीत होतो हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल करणेस तयार आहे. गट नं.८९/२ चे संपादन झाले. मला आता नि.क्रं.९ वरील सात बारा उतारा दाखविणेत आला. हे म्हणणे खरे

आहे की सदर उतारा हा ५ गुंठे क्षेत्राचा असुन त्यावर पुर्नवसनाचा शिक्का आहे. सदर उतारा हा सन १९९२-९३ ते २००४-०५ चा आहे. मला आता नि.६९ वरील निवाडा दाखविणेत आला. सदरचा निवाडा मी वाचुन घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर निवाडयात पुर्नवसनाच्या कारवाईच्या तारखा नमुद आहेत. हे मला लक्षात नाही की दि.१८.०५.१९९९ रोजी पुर्नवसनाचा प्रस्ताव मिळाला होता व दि.२०.१०.१९९९ रोजी संयुक्त मोजणी झाली असे त्यात नमुद आहे. हे मला सांगता येणार नाही की दि.३१.०७.१९९९ रोजी कलम ४ अन्वये संपादनाची अधिसुचना प्रसिद्ध केली होती. दि.१०.०८.१९९९ रोजी ती अधिसुचना वृत्तपत्रात प्रसिद्ध केली होती. तो निवाडा मी दाव्यात रद्द करुन मागितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.०८.०२.२००२ रोजी कब्जेपट्टी झालेली आहे. हे मला माहिती नाही की दि.०८.१२.१९९९ रोजी चंद्राबाई धायगुडे हिचा संपादनाबाबत जबाब नोंदविला होता. दस्त करण्यापुर्वी पुर्नवसनाबाबतची माहिती मी व माझ्या मुलाने घेतली होती. पुर्नवसनाची माहिती मी किती तारखेला व कोणत्या कार्यालयातुन घेतली हे मला सांगता येणार नाही. हे मला माहिती नाही की संपादनाची रक्कम मुळ मालकाच्या नावे जमा होती. हे म्हणणे खरे नाही की मिळकत संपादन झालेली आहे याची माहिती असताना बेकायदेशीर दस्त केला. हे म्हणणे खरे नाही की सदरचा दस्त दुय्यम निबंधक यांची दिशाभुल करुन नोंदवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की पोटहिस्से हे सन २००१ पुर्वीच झालेले आहेत. मी दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.४९ वरील सात बारा उताऱ्यात पोटहिस्सा नमुद असुन तो सन २००० मधील आहे. हे म्हणणे खरे नाही की जमीन संपादन झाल्याची माहिती असताना ती बळकावण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत खरेदीदस्तापासुन दावा मिळकतीत माझी कब्जेवहिवाट आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांनी संपादनाची केलेली कारवाई कायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की कुठलेही कारण नसताना मी प्रतिवादींना खोटी नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की कुठलेही कारण नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवडयात घडले नसताना मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांनी कायदेशीर प्रक्रियेशिवाय संपादन केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीत माझी कब्जेवहिवाट आहे हे दाखविण्याकरीता माझ्या तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीला माझ्या नावाची नोंद आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल करणेस मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की

दावा मिळकतीची मालकी कधीही मला मिळाली नव्हती व त्यात माझी कब्जेवहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटा दावा दाखल केल्याने कारवाई होण्याच्या भितीने गणपत हा साक्ष दयायला आलेला नाही.

(प्रतिवादी क्रं.५ ते ७ यांच्याविरूद्ध प्रकरण एकतर्फा असल्याने त्यांचा उलटतपास नाही.)

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : ०७.०१.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.